# महाराष्ट्रातील स्त्री परिवर्तनाच्या इतिहासाचा मागोवा इ.स. १८१८ ते १९६०

शोधपत्र-इतिहास

*डॉ. शारदा बंडे

भारतातील महिलांचा इतिहास बघीतल्यास अध्यात्मिक युगात तिला मानाचेस्थान होते.नंतर मग अथर्ववेद, सामवेद, यजुर्वेदात तिला नाहीसे करण्यात आले. मनुने तर तिला पुर्णपणे साखळदंडात बांधून ठेवले होते. त्याने रचलेल्या वर्णात तर तिला कुठेही स्थान न देता तिचे अस्तित्वच नाहीसे केले आहे. मध्ययुगीन काळात परकीय आक्रमणे वाढली, भारतात पडदा पद्धत आली. विजेताही स्त्रियांवर अत्याचार करु लागले. आधुनिक काळात विशेषत् पेशवाईच्या काळात स्त्री ही भोगवस्तू बनली, अत्यंत किळस येण्यापर्यंतची तिची अवस्था झाली होती. याचाच स्फोट होवून राजाराममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर या बंगाली स्त्री समाज सुधारकांचा प्रभाव महाराष्ट्रावर पडला. यातूनच म.ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले या दांपत्याचा उदय झाला. यांच्याच कार्याचा वारसा घेवून राजर्षी शाहु महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी रानडे, कर्वे, आगरकर लोकहितवादी यांच्या विचारातून व कायद्यातून स्त्री पुढे आली. त्यातच ब्रिटीश राजवट स्त्रीयांसाठी वरदानच ठरली. त्यांनी केलेला विधवा पुनर्विवाह कायदा, सतीप्रथा बंदी कायदा करुन जीवनात भर घातली.

कारण स्त्रीला घरातून उंबरठ्यापर्यंत आणण्यासाठी 19 वे शतक लागले. त्यातच ताराबाई शिंदे लिखित 'स्त्री–पुरुष तुलना' हे पुस्तक स्त्रीयांसाठी प्रेरणादायक ठरले. महाराष्ट्रातील विविध प्रयत्न : महाराष्ट्रातील विविध समाजसुधारकांनी 'स्त्री' प्रश्नांच्या संदर्भात काम केले. आधुनिक महाराष्ट्राचे आद्य शिल्पकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी विधवा विवाह, स्त्री शिक्षण, शिक्षण प्रसार, पुनर्विवाह पुरस्कार करणे अशी तात्कालीन समाजातील बंडखोरी वाटावी असे प्रयत्न केले. लोकहितवादी यांनी 'पुनर्विवाहोत्तेजक मंडळी' संस्था स्थापून विधवा विवाहाचा पुरस्कार केला. विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन देणा–या दादोबा पांडूरंग तर्खडकर यांनी सामाजिक जागृति आणि प्रसारासाठी 'ज्ञान प्रसारक सभा' स्थापली. म.फुले व सावित्रीबाई हे कर्ते सुधारक असल्यामूळे ते विचार मांडून न थांबता त्यांनी मुलींसाठी शाळा सुरु करुन प्रत्यक्ष कार्याला सुरुवात केली. विधवा पुनर्विवाह पुरस्कार, अनाथ बालकाश्रम सुरु करणे या गोष्टी त्यांच्यातील मोठेपणाच्या निदर्शक होत.

स्त्री सुधारणा चळवळीत कायद्याचा मार्ग: 19 व्या शतकाच्या सुरुवातीस ''स्त्री धन'' वगळता स्वतंत्र मालमत्तेचा वारसा हक्क स्त्रीला नव्हता. तिच्या स्वकष्टार्जीत मालमत्तेवरही तिचा संपूर्ण अधिकारी नव्हता. तिला दत्तक घेण्याचा अधिकार नव्हता. ती पुरुषांची राखीव मक्तेदारी होती. पत्नि हयात असताना पती दुसरे लग्न करु शकत असे, मात्र स्त्रीला तो अधिकार नव्हता. एवढेच नव्हे तर पती मेल्यावरही नव्हता. पुरुषी या संदर्भातील भूमिका दुटप्पीपणाची होती.

–इ.स.1829 सतीबंदी कायदा, बालविवाह कायदा. – इ.स.1856 विधवा पुनर्विवाह. – इ.स.1872 नोंदणी विवाह कायदा. (Special Marriage Act)–इ.स.1937 हिंदू स्त्री मालमत्ता हक्क कायदा.–इ.स.1946 द्विभार्या प्रतिबंधक कायदा.–इ.स.1955 केंद्रिय हिंदू कायदा घटस्फोट कायदा.

विधवांच्या संदर्भातील कार्य : विधवांना अर्थसहाय्य करण्यासाठी एल्फिन्स्टनने नेटीव्ह पेन्शन फंड सुरु केला. 1891 मध्ये महाराष्ट्रातील विधवांची संख्या पुढीलप्रमाणे होती.

| वयोगट | विधवा |
|---|---|
| 0 ते 4 वर्षे | 13,878 |
| 5 ते 9 वर्षे | 64,040 |
| 10 ते 12 वर्षे | 87,266 |

महात्मा फुलेंच्या कार्यापासून प्रेरणा घेवून पंढरपूर येथे प्रार्थना समाजाची धुरीण लालशंकर उमीया

*इतिहास विभाग प्रमुख, स्वा. सै. सू पवार महाविद्यालय पूर्णा जि. परभणी

यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची त्याची शाखा नाशीकलाही होती. त्याला लोकहितावादी, वि.मो.भिडे, का.म.थत्ते यांची मदत झाली. गर्भवती विधवेला गर्भपाताचे औषध न देता प्रसुतीसाठी गृहात आणून सोडणारास दहा रुपये बक्षीस देण्यात येई. या कार्यासंबंधीचे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न 'सुबोध पत्रिकेत' केले.

विधवा विवाहास उत्तेजक मंडळी : वर्धा येथे 31 डिसेंबर 1893 रोजी श्री.वा.वि.परांजपे यांच्या बैठकीत 'विधवा विवाहास उत्तेजक मंडळी' संस्था स्थापण्यात आली. इ.स. 1895 मध्ये या संस्थेचे नामकरण विधवा विवाह प्रतिबंधक निवारक मंडळी करण्यात आले. या संस्थेचे अध्यक्षपद डॉ.रा.गो.भांडारकर भुषवित होते. विधवा मुलीच्या शिक्षणाचा प्रश्न सुटावा म्हणून महर्षी कर्वे यांनी 1898 मध्ये 'अनाथ बालिकाश्रम' संस्था सुरु केली. त्यालाही चांगला प्रतिसाद मिळाला व पुनर्विवाहाची चळवळ मूळ धरु लागली. त्याच्याच पुढची पायरी इ.स.1872 च्या नोंदणी विवाह कायद्याने घेत भिन्न धर्मियांना कायदेशीर विवाह करण्याची परवानगी देणारा होता. त्यामूळे धर्मांतर न करता विवाह करता येवू लागला. प्रथम पत्नी असताना दुसरा विवाह करण्याची सक्त मनाई या कायद्याने आली. सोराबजी खरोठजी लांग्रना हे मूळ पार्शी नंतर खिश्चन झाले. त्यांची पत्नि मुळ हिंदू पण नंतर खिश्चन झाली. त्यांचा छळ झाल्यावर ते मुंबईहून पुण्याला आले. मुलीच्या शिक्षणासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांची मुलगी कॉर्नेलिया सोराबजी ही महाराष्ट्ातील पहिली पदवीधर 'स्त्री' होय. इ.स.1937 च्या हिंदू स्त्री हक्क कायद्याने कर्त्या पुरुषांच्या मृत्युनंतर मुला बरोबरच विधवा पत्नीला स्वतंत्र हिस्सा देण्यात येवू लागला. त्यानंतर हिंदू विवाहित स्त्रियांस विभक्त राहून पोटगी मागण्यास हक्क मिळाला.

कामगार 'स्त्री' चे परिवर्तन : इ.स.1890 च्या नंतर स्त्री कामगारांचा स्वतंत्र कामगार म्हणून विचार करण्यात येवू लागला. कारण 1890 च्या कामगारांच्या पहिल्या जागतिक परिषदेत स्त्रियांच्या व मुलांच्या कामाचा आढावा घेण्यात आला. इ.स.1891 च्या फॅक्टरी ॲक्ट अन्वये स्त्रियांच्या कामाचे तास, साप्ताहिक सुट्टी, कामाचे मर्यादित तास, स्त्रियांना फक्त दिवसा काम देण्यात येवू लागले. इ.स.1929 पासून प्रसुती रजा मंजूर करण्यात आली.1939 व 48 च्या कायद्याने घातक व ताण पडणा—या कामावर स्त्रियांना न ठेवण्याचे बंधन आले. स्त्री शिक्षणाच्या विचारांचा विकास : स्त्री शिक्षणाच्या संदर्भात म.फुले व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांचे कार्य अत्यंत महत्वाचे आहे. 5 जानेवारी 1831 रोजी जन्मलेल्या सावित्रीबाईंचा विवाह तत्कालीन पद्धती प्रमाणे अल्पवयात झाला. म.फुलेंची विवाह झाल्यावर त्यांचे कर्तृत्व व व्यक्तिमत्व फुलून आले. फुलेंनी त्यांना अक्षर ओळख दिली त्याचे सावित्रीबाईंनी चीज केले. मिसेस मिचेल यांच्या नॉर्मल ट्रेनिंग स्कूलमध्ये शिक्षिकेचे ट्रेनिंग त्यांनी घेतले. इ.स.1848 मध्ये पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरु झाली ती फुले यांच्या प्रयत्नातून पुढे इ.स. 1852 पर्यंत 18 शाळा झाल्या मुलींसाठी, स्त्रिया शिकू व शिकवू लागल्या अठरापगड जाती जमातीतील स्त्रिया शिक्षक झाल्या.

विद्यापीठीय पातळीवरील प्रयत्न : इ.स.1883 सालापासून मुंबई विद्यापीठात स्त्रीयांना प्रवेश मिळू लागला. वुमेन्स इंडिया असोसिएशन, बॉम्बे प्रेसिडन्सी, वुमेन ग्रॅज्युएट युनियन, दि बॉम्बे प्रेसिडन्सी, वुमेन्स कॉन्सिल ऑफ वुमेन या संस्थांनी स्त्रीयांच्या विकासासाठी महत्वाचे कार्य केले. इ.स. 1889 ते 1912 या काळात 5 महिला पदविधर झाल्या 20 व्या शतकात एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाची स्थापना झाली त्यामूळे शिक्षणाला अधिक गती मिळाली. 1957 मध्ये ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्सच्या ठरावानुसार जेथे विद्यार्थीनी शिक्षण घेतात तेथे प्राध्यापक नेमण्यात येवू लागले. 1941 साली महिलांसाठी सोफीया महाविद्यालय कला, गृह विज्ञान, सामाजिक व सांस्कृतिक विषयासाठी निघाले. पदवी—पदव्युत्तर, पीएच.डी. येथपर्यंतचे शिक्षण स्त्रीया घेवू लागल्या.

वैद्यकीय क्षेत्र : मेडिसीन आणि सर्जरी विद्येत कृष्णाबाई केळकर, काशीबाई नवरंगे, सुंदराबाई किर्तने यांनी स्वतःची क्लिनिक काढली. डॉ.आनंदबाई जोशी वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी परदेशात गेल्या व एम.डी. होवून आल्या. त्या पहिल्या भारतीय स्त्री डॉक्टर ठरल्या.

अस्पृश्य स्त्रियांच्या संदर्भातील प्रयत्न : आतापर्यंतचे स्त्रीयांच्या शिक्षण संदर्भील कार्य हे प्रामुख्याने वरिष्ठ वर्गाच्या संदर्भात होते. त्यामूळे समाजातील एक फार मोठा वर्ग या सुधारणां पासून दूर होता. त्यामूळे म. फुले यांनी मुलींच्या ;तत्कालीन समाजात अस्पृश्य ठरविलेल्याद्ध शाळा काढल्या. याच शाहेतील चौथीच्या मुक्ता साळवे या विद्यार्थीनीने 'मांग महाराच्या दुःखा विषयी' लिहीलेला निबंध फुले, आंबेडकर साहित्याचे

आम्यासक हरी यांच्या मते अक्षर वाड्मय आहे. या मुलीने आम्हाला जर वेदांचा अधिकार नाही तर आमचा धर्म कोणता ध असा प्रश्न विचारला आहे. महर्षी अण्णासाहेब शिंदे उर्फ विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'दि डिस्प्रेड क्लास मिशन' च्या माध्यमातून स्त्रियांसाठी कार्य युरु केले. त्यांच्या भगीनी जन्नाका यांनी शिक्षण झाल्यावर नानापेठेतील अहिल्याश्रम या मागास वस्तीत समाज कार्य सुरु केले. फिमेल हायस्कूल मधून इंग्रजी मॅट्रीक झालेल्या जन्नाकांनी आपले आयुष्य महिलांसाठी वाहून घेतले. मिशनची 1912 मध्ये परिषद भरली असता रमाबाई रानडे यांच्या अध्यक्षते खाली झाालेल्या सभेत 200 स्त्रिया सहभागी झाल्या.

स्त्री अर्थ जीवन : स्त्रीयांनी शिकले पाहीजे या टप्प्यापर्यंत प्रगती झााल्यावर अपरिहार्यपणे पुढील मुद्दा येणे आवश्यक होते तो म्हणजे आर्थिक स्वावलंबन, अर्थात सुशिक्षीत आणि अशिक्षीत महिलांना वेगळ्या स्वरुपाची कामे मिळत असत. 1851 पासून मुंबईत कापड गिरण्या वाढत गेल्यावर स्त्री मजूर कामावर घेणे अवश्यक झाले. 1884 पर्यत त्यांची संख्या 251 पर्यंत पोहचली. सूत कातणे व सूत गुंडाळणे या कामत त्या प्रवीण होत्या. कोळसा खाणीत धोका. दायक कामांवर नियम डावलून महायूद्ध काळात त्यांना घेण्यात आले. याच काळात विधवा स्त्री कामगारांचे प्रमाणही वाढले होते. वीज नसल्याच्या कालखंडात गिरण्यात स्त्रीयांना सुर्योदय ते सूर्यास्त काम असे. नेमून दिलेले काम पूर्ण न झाल्यास सुटी मिळत नसे व खाडा केल्यास दोन दिवसांचा पगार कापला जाई. 1891 मध्ये दोन स्त्रीयांनी कामाच्या तासाला विरोध दर्शवून शेकडो कामगारांसमोर भाषण केले. रात्रपाळीला स्त्री कामगारांना येणा–या समस्या संपण्यास सुरुवात झााली. 1920 पासून कामगार हितवर्धक संघाने स्त्रियांच्या प्रसूतीपूर्व व तर कालखंडा बाबत सुटी देण्याची गरज प्रतिपादली. याचा परिणाम होवून 1929 मध्ये मॅटर्निटी ॲक्ट संमत करण्यात आला. 1934 मध्ये पाळणाघराच्या संदर्भातही कायदा झााला.

स्वातंत्र चळवळीतही महिलांचा सहभाग : भारतीय स्त्रीयांना स्वातंत्र चळवळीत सहभागी करुन घेण्याचे सर्वात जास्त श्रेय महात्मा गांधी यांना आहे. सविनय कायदेभंग चळवळीत अवंतिकाबाई गोखले आघाडीवर होत्या त्यांनीच महाराष्ट्रात म.गांधी यांचा संदेश घरोघरी नेण्याचे काम केले. यशोदाबाई भट, प्रेमाबाई कंटक, गोदावरी परुळेकर, शांताबाई मुखर्जी यांनी अहिंसेचा संदेश महाराष्ट्भर नेला. सूतकताई, अहिंसा, सविनय कायदेभंग चळवळ यात स्त्रीयांनी भाग घेतला. महाराष्ट्रातील मिठाच्या सत्याग्रहात शेकडो स्त्रीयांनी भाग घेतला. व–हाडची वाघीण उर्फ दुर्गाबाई जोशी, यशोदाबाई आगरकर, पार्वतीबाई पटवर्धन, यांनी अकोला जिल्ह्यात दहीहंडी येथे खा–या पाण्याच्या विहीरीवर सत्याग्रह केला. आगरकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नि यशोदाबाई आगरकर यांनी केशवपन केले नाही. पत्री सरकारात कांतीसिंह नाना पाटील यांच्या तालमीत तयार झालेल्या डॉत्रउत्तमराव गिरधर पाटील व त्यांच्या पत्नि लीलाबाई यांनी स्वातंत्र चळवळीत सक्रीय सहभाग घेतला. मार्शल लॉ तोडण्याचा पराक्रम केला. येरवडा तुरुंगातून पलायन केले.

हैद्राबाद मुक्ती संग्रम : स्त्रीयांच्या राजकीय जाग्रतीचा अविष्कार हैद्राबाद मुक्ती संग्रामात दिसून आला. हैद्राबाद संस्थानात निजामाचे राज्य असल्याने सुधारणांचा वाटा या भागाला लाभलेला नव्हता. 1938 पासून स्त्रीयांचा सहभाग या संस्थांनी प्रदेशात वाढू लागला. स्त्रीयांनी मोर्चे, तुरुंगवास, भूमिगत चळवळीत सहभाग घेतला. दगडाबाई शेळके यांनी सशस्त्र उठावाच्या दिशेने प्रयत्न केले. आशाताई वाघमारे यांनी तुरुंगातील कैद्यांच्या कुटूंबियांची काळजी घेणे, निरोप पोहचविणे शस्त्रास्त्रांची ने–आण करणे, तुरुंगवासात कैद्यांसाठी साक्षरता वर्ग इत्यादी कामे कली. पानकुंवर फिरोदिया यांनी शस्त्रास्त्रे जमा करणे व संग्रामार्थ निधी गोळा करण्याची कामे केली. याची अंतीम परिणती हैद्राबाद मुक्त होण्यात आणि मराठवाडा महाराष्ट्रात सामील होण्यात झाली.

संयुक्त महाराष्ट चळवळ : संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत महिला पुरुषांच्या बरोबरीने लढल्या. मुंबईत संयुक्त महाराष्ट् महिला परिषद सुमती गोरे यांच्या नेतृत्वाखाली भरविण्यात आली. पुणे शहरात अशीच परिषद गंगुताई पटवर्धनांच्या नेतृत्वाखाली भरली. दादर येथे अनुताई लिमये, शिरीष पै, शांता गोखले, शांता फाटक, चारुशिला गुप्ते या सर्वपक्षीय महिला नेत्यांनी संयुक्त महाराष्ट् परिषदेचे अधिवेशन भरविले यातूनच चळवळ पुढे गेली व संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाले.

स्त्री सुधारणा मधील सुधारकांचे योगदान : ज्ञानोदय वृत्तपत्रात दिलेल्या मुलाखतीत महात्मा फुले यांनी आपण मुलींची शाळा का सुरु केली, हे स्पष्ट केले यामध्ये ते म्हणतात,''प्रथम मनात आले की,

आईच्या योगाने मुलांची जी सुधारणूक होते ती फारच चांगली आहे. म्हणूनच मुलींचीच शाळा प्रथम घालावी. '' यावरुन म.फुले यांची मनोभुमिका आपणांस समजू शकते. पहिले स्त्रीवादी पुस्तक ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री–पुरुष तुलना' लिहीले. 1882 च्या या ग्रंथाने सर्वत्र खळबळ उडवून दिली तेव्हा 'सत्सार' नियतकालिकातून ज्योतीरावांनी ताराबाईंना पाठिंबा दिला. मुक्ता साळवे ही फुले यांची विद्यार्थीनी तिने 'मांग महारांच्या दु:खा विषयी निबंधात दलित स्त्रीयांना उघड्यावर बाळंतपणाला सामोरे जाताना सोसाव्या लागणा–या हालअपेष्टांचे वर्णन केलेले आहे. ते डोळ्यांना पाणी आणते. म.फुले यांच्यापासून प्रेरणा घेवून तान्हुबाई बिर्जे ही भारतातील पहिली महिला संपादक झाली तर सावित्रीबाई रोडे 'रामोशी समाचार'

मधून दलित दु:खाना वाचा फोडू लागली.

स्त्री–पुरुष समानतेचा संदेश : म.फुले यांच्या प्रेरणोने आणि नारायण मेघाजी लोखंडे यांच्या पुढाकाराने केशवपन विरोधात नायिकांनी संप केला. त्याची दखल लंडनमधील वृत्तपत्रांनी घेतली. 25 मार्च 1893 रोजी मुंबईतील जेकब मिल मधील स्त्रीयांनी

व्यवस्थापक पुरुषांना धडा शिकविला, या कामासाठी 400 स्त्रीया एकत्र आल्या. लक्ष्मीबाई नायडू यांच्या अध्यक्षतेखाली 1925 साली विदर्भात सत्यशोधक महिला परिषदेच्या सभेला 5000 महिला उपस्थित होत्या. अनिष्ठ रुढी,अपमानास्पद विधी, हुंडा यांना नकार देवून स्त्री–पुरुष समानतेवर आधारित 'सत्यशोधक विवाह पद्धती' सुरु केली. या पद्धतीचा पहिला विवाह 25 डिसेंबर 1873 रोजी श्री सीताराम जबाजी आल्हाद व मंजूबाई ग्यानोबा निंबाणकर यांचा झाला.

ताराबाई शिंदे : यांनी महात्मा फुले यांच्या कार्यापासून प्रेरणा घेवून स्वत:चे स्वतंत्र विचारातून 'स्त्री–पुरुष तुलना' या पुस्तकाम मांडले. ताराबाईचे वडिल बापूजी हरी शिंदे हे म.फुले यांचे अनुयायी होते. ताराबाईंना मराठी, इंग्रजी, संस्कृत येई. पुरुष वर्चस्व संपविल्यास समाजाची निकोप वाढ होईल असेही मत त्यांनी मांडले. एकतर्फी पतिव्रतांची कल्पना, बाल विधवांवरील सक्ती, अंधश्रद्धा यांचा त्यांनी लेखनातून निषेध केला.

रमाबाई रानडे 1862–1924 : रमाबाईंनी बिपीन बिहारी मेधावी यांच्याशी केलेला आंतरजातीय विवाह गाजला. स्त्री शिक्षिका, स्त्री इन्सपेक्टर पाहीजे, भारतीय महिला परिषदेच्या त्या अध्यक्ष झाल्या.

डॉ.आनंदीबाई जोशी 1865–1887: नवव्या वर्षी गोपाळराव जोशी या विधुराषी विवाह झाला. त्या पहिल्या डॉक्टर ठरल्या.

डॉ.रखमाबाई 1864–1955 : अल्पवयीन असताना लग्न, शिक्षणासाठी न्यायालयाने ठोठावीलेला दंड भरला व शिक्षण पूर्ण केले.

जनाक्का शिंदे 1878–1956 : विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भगिनी होत. निराश्रीत सहायकारी मंडळीत सामील होवून कार्य केले.

समारोप : अशाप्रकारे महाराष्ट्रातील स्त्रीयांचे परीवर्तन होवून स्त्री ही पुर्णपणे सबला बनली आहे. इ.स.1975 साल हे स्त्री सबलीकरणाचे वर्ष म्हणून पाळले गेले. पुढे 1995 मध्ये बिजिंग येथे आंतरराष्ट्रीय महिला परिषद पार पडली. यात स्त्री ही पुर्ण मानव आहे का हा प्रश्न पुढे आला. तेव्हापासून भारत सरकारने विविध योजनेच्या माध्यमातून स्त्रीयांना पुढे आणण्याचे काम केले आहे. इ.स.1998 पासून महाराष्ट्र हे स्त्री सक्षम करण्यासाठी वेगवेगळ्या योजना राबवणारे एकमेव पहीले राज्य ठरले आहे. अशा प्रकारे स्त्रीला 1995 महिला आयोगापासून स्थानिक स्वराज्य संस्थेत 33 टक्के आरक्षण मिळाले. तेव्हापासून स्त्री राजकारणात येत आहे. पण विधानसभा व लोकसभासाठी हे तत्व अंगीकारले तर महिला परिवर्तन पूर्ण झाले म्हणता येईल.

## सन्दर्भ ग्रन्थ


1. धनंजय कीर . महात्मा फुले, प्रकाशक – पॉप्यूलर, मुंबई. दु.आ.1973.
2. नरेंद्र गायकवाड–मराठवाड्यातील चळवळ आणि हैद्राबादचा स्वातंत्र संग्राम सुगावा प्रकाशन, पुणे –1990.
3. प्रा.आर.एन.पारधी–भारतीय स्त्री जीवन व कर्तृत्व वेदमुद्रा प्रकाशन, अमरावती, 14 नोव्हे.2005.
4. प्रा.गणेश राउत –महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहा डायमंड पब्लिकेशन्स, टिळक रोड, पुणे, जुलै 2006.
5. प्रा.सुनिता अंकुश–स्त्री उंबरठ्या बाहेरील जग, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.